# परिशिष्टे


| परिशिष्ट क्र. | परिशिष्टाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1. | निरीक्षण श्रेणी | 91 |
| 2. | शिक्षक क्षमता यादी | 93 |
| 3. | प्रशिक्षणार्थींच्या नावांची यादी | 94 |
| 4. | नमुना पत्र (मा. शिक्षणाधिकारी) | 95 |
| 5. | नमुना पत्र (मा. मुख्याध्यापक) | 96 |
| 6. | तज्ज्ञ प्राध्यापकांची यादी | 97 |

प्रकरण पहिले

# "संशोधन विषयाची ओळख"

# प्रकरण पहिले

# संशोधन विषयाची ओळख

**विभाग एक**

1.1 शिक्षक प्रशिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

1.2 विषय प्रवेश

**विभाग दोन**

1.3 शालेय अनुभव कार्यक्रम संकल्पना

1.4 विविध विद्यापीठांतर्गत सध्याची कार्यवाही पध्दती

**विभाग तीन**

1.5 प्रशिक्षणाचे स्वरूप

1.6 संशोधनाची गरज व महत्व

1.7 संशोधन समस्येची निश्चती व शीर्षक

1.8 संशोधन समस्येतील संज्ञांच्या व्याख्या

1.9 संशोधनाची उद्‌दिष्टे

1.10 संशोधनाची गृहीतके

1.11 संशोधनाची परिकल्पना

1.12 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

1.13 प्रकरण योजना

# प्रकरण पहिले

# संशोधन विषयाची ओळख

## विभाग एक

### 1.1 शिक्षक प्रशिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

प्राचीन भारतीय शिक्षणाची परंपरा उज्ज्वल आहे. आर्यांचे वैदिक वाङ्मय, आर्यांची महाकाव्ये-पुराणे, अभिजात वाङ्मय, शास्त्रीय कलात्मक वाङ्मय, शिक्षणाचे धर्मनिष्ठ ध्येय, गुरूकुल पध्दती, शील संवर्धन, व्यक्तिविकास समाजऋण व व्यावसायिक नीती, सधन अभ्यासक्रम व संयुक्तिक पध्दती, अध्यापन पध्दती, वैयक्तिक लक्ष वगैरे विशेष साररूपाने सांगता येतील.

ही परंपरा टिकविण्याचे कार्य पाठशाळा, आश्रम, विहार मठ या संस्थात असे. प्राचीन विद्या केंद्रे उदा. तक्षशीला (इ. स. पूर्व 800 ते इ. स. 400), नालंदा (इ. स. 400 ते 1200), विक्रमशीला (सुमारे इ.स. 800 ते 1200), वल्लभी (इ. स. 450 ते 775), काशी (इ. स. पूर्व 1000 ते आजपर्यंत, कांची (इ. स. पूर्व 2 रे शतक ते 13 वे शतक) ही केंद्रे भारतीय शिक्षणाचा प्रसार करीत. मुस्लीम राजवटीत प्राथमिक शिक्षण मत्काबात तर उच्च शिक्षण मदरशात, धार्मिक शिक्षणात (कुराणावर) भर.

पुढे ब्रिटीश राजवट सुरू झाल्यानंतर इंग्रजी माध्यमातून शिक्षण सुरू झाले व नवीन विषय अभ्यासक्रमात समाविष्ट झाले. इंग्रजी विदेशी भाषा, नवीन पाश्चात्य शास्त्रे, नवीन शैक्षणिक विचार यामुळे शिक्षण प्रशिक्षणाची आवश्यकता भासू लागली. भारतात होतकरू शिक्षकाला प्रशिक्षित करण्यासाठी (Monitorial) पध्दती चालू होती. वर्गातील हुशार विद्यार्थी मॉनिटर कमी बुध्दीच्या मुलांना शिक्षकांच्या गैरहजेरीत शिकवी. ही पध्दती डॉ. बेल (धर्मोपदेशक) याने मद्रासमध्ये पाहिली. ही पध्दत सोपी आणि कमी खर्चाची होती व गरीब मुलांना शिकविण्यास उपयुक्त होई. म्हणून डॉ. बेल याने ही पध्दती इंग्लंडमध्ये चालू केली. शिकाऊ मुले थोडी असल्याने ही पध्दती वापरता येईल. त्यावेळी शिक्षक संख्या ही थोडी होती.

**प्रशिक्षणाची सुरुवात :-**

19 व्या शतकाच्या आरंभापासून शिक्षकांच्या प्रशिक्षणात अखंडितपणा व क्रमबध्दता आली.

प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी सेरामपूर (बंगाल) येथे विल्यम कारे याने 1802 मध्ये नॉर्मल स्कूल (प्रशिक्षण शाळा) सुरू केली आणि 1819 साली स्थापन झालेल्या कलकत्ता स्कूल सोसायटीने एतद्देशीय प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी 500 रु. अनुदान दिले (1825). कलकत्ता महिला सोसायटीने शिक्षिकांसाठी एक प्रशिक्षण वर्ग कलकत्याला कन्या शाळेत काढला. (1828)

मुंबईच्या नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीने 24 प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षित केले (1826) आणि एलिफस्टन इन्स्टिट्यूटमध्ये प्रशिक्षण वर्ग सुरू केला. (1829) कारण प्राथमिक शाळांची संख्या वाढत होती. ह्या प्रशिक्षणात विषयज्ञान वाढविण्यावर भर होता. शिकविण्याच्या पध्दतीकडे नव्हता. तरीपण हा प्रयत्न अग्रेसर असून अतिमहत्वाचा होता.

1826 मध्ये मद्रासचे गव्हर्नर सर थॉमस मनरो यांना प्रशिक्षित शिक्षकांची गरज भासली. म्हणून शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी त्यांनी केंद्रीय शाळेची शिफारस केली. त्या प्रशिक्षण शाळेत वेगवेगळे विषय शिकविले जात. प्रशिक्षणात विविध विषयातील ज्ञानसंवर्धनाचा हेतू होता. अध्यापन पध्दतीवर भर नव्हता.

1854 पर्यंत प्रशिक्षणाच्या तुरळक प्रयत्नांनी फारशी प्रगती केली नाही. त्या वर्षाच्या वुडच्या खलित्याने शिक्षकांच्या शिक्षणाची गरज दाखवून दिली. प्रत्येक इलाख्यात शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्ग आणि शाळा स्थापण्याची कल्पना मांडली. ह्या खलित्याने प्रामुख्याने प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा पुरस्कार केला. नॉर्मल स्कूलमध्ये शिक्षक प्रशिक्षित झाला की त्याला प्रमाणपत्र मिळे व योग्य वेतनावर नेमण्यात येई. 1859 मध्ये सर्व इलाख्यामध्ये प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी नॉर्मल स्कूल्स स्थापण्यात आली.

मुंबई इलाख्यात प्रत्येक तालुक्यातील निवडलेल्या उमेदवारांना त्या भागातील विद्वान शिक्षकांच्या हाताखाली 3 वर्षे शिकावे लागे. तो अभ्यासक्रम पुरा झाल्यावर जिल्ह्याच्या प्रशिक्षण विद्यालयात पुढील अभ्यासासाठी पाठविण्यात येई. बंगालमधील चार नॉर्मल स्कूल्समध्ये 258 विद्यार्थी होते. मद्रास सरकारने 1858 मध्ये एक नॉर्मल स्कूल स्थापिले व त्याला आदर्श सराव अध्यापन शाळा जोडली.

1855 मध्ये मुंबईच्या सार्वजनिक शिक्षण संचालक हावर्ड यांनी इंग्लिश शाळेतील उपशिक्षकांसाठी नियमित-प्रशिक्षण विद्यालय सुरू केले. पुढे मद्रासने पुढाकर घेवून 1856 साली सुरू केलेल्या शासकीय नॉर्मल स्कूलसला 1886 साली विद्यालयाचा दर्जा दिला व त्याचे नाव शिक्षक विद्यालय असे ठेवले.

1881 मध्ये माध्यमिक शिक्षकांसाठी दुसरे प्रशिक्षण विद्यालय लाहोर (पूर्वीचा पंजाब - आता पाकिस्तान) बी. टी. पदवीसाठी सुरू करण्यात आले. त्या विद्यालयात माध्यमिक शाळेतील विषय शिकविले जात व व्यावसायिक शिक्षण फारच थोडे होते. कारण त्यावेळी अशी पक्की समजूत होती की, शिक्षकाला विषयज्ञान पुरेसे असले की, उत्तम शिक्षक होण्यासाठी प्रशिक्षणाची जरूरी नाही. त्यावेळी विषयाचा प्रगत अभ्यास महत्वाचा, की अध्यापनाची तत्वे व सराव महत्वाचा यासंबंधी जोरदार चर्चा होत होती. म्हणजे प्रशिक्षणाची संकल्पना स्पष्ट नव्हती.

1882 च्या शिक्षण आयोगाने महत्वाची शिफारस केली की, शासकीय किंवा अशासकीय प्राथमिक शाळांच्या स्थानिक गरजा लक्षात घेवून नॉर्मल स्कूल्स त्या त्या भागात सुरू करावीत.

माध्यमिक शाळांतील शिक्षकांसाठी आयोगाने असे सुचविले की अध्यापन-शास्त्राची तत्वे व प्रात्यक्षिक अध्यापन कार्य यांची परीक्षा सुरू करावी. शासकीय / अशासकीय शाळेत कायम नोकरी मिळविण्यासाठी ही परीक्षा उत्तीर्ण व्हावयास पाहिजे.

हंटर आयोगाने प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या गरजेवरभर देवून निधीचा पहिला भार शिक्षकांच्या प्रशिक्षणावर खर्च करावयाचा निधीची शिफारस केली. तरी सुध्दा प्रशिक्षणाच्या सोयीमध्ये प्रगती नव्हती. कारण प्रशिक्षणाचा जुना दृष्टिकोन बदलला नव्हता. विषय ज्ञान भरपूर असले की, प्रशिक्षणाची जरूरी नाही हा विचारप्रवाह इंग्लंडमधील 'पब्लिक स्कूल' मध्ये होता. परंतु या शाळेत सरदार उमरावांची मुले जात तसेच प्रशिक्षणाची अट फक्त कायम नोकरीसाठी होती. त्यामुळे सर्वसामान्य शिक्षकांनी प्रशिक्षणाकडे लक्ष दिले नाही. तसेच शिक्षण संस्थांनी प्रशिक्षित शिक्षक नेमले पाहिजेत असे त्यांच्यावर बंधन नव्हते. शिवाय नव्या प्रशिक्षण संस्थांसाठी सुरू झाल्या नाहीत. परिणामी 19 व्या शतकाच्या अखेरीस माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी फक्त सहाच संस्था होत्या.

1899 मध्ये मुंबईने S. T. C. (Secondary Teacher's Certificate) (माध्यमिक शिक्षक प्रमाणपत्र) परीक्षा सुरू केजली. ही परीक्षा संचालक, सार्वजनिक शिक्षण यांनी नियोजित केली व विभागीय निरीक्षकांनी चालविली.

परीक्षेचे दोन विभाग होते - 1) अध्यापन तत्वे, 2) अध्यापन सराव

**अध्यापनाच्या प्राथमिक परीक्षेतील बाबी :-**

1) विषयाचा बिनचुकपणा, प्रश्न कौशल्य, स्पष्टीकरण क्षमता, भाषा स्पष्ट वर्गाल उपयुक्त, वर्गशिस्त, फलक लेखन, नियमित वेळात अध्यापत पूर्ती तसेच त्यांचे अध्यापन नैपुण्य दाखविण्यासाठी व वर्गव्यवस्था कौशल्य दाखविण्यासाठी विभागीय निरीक्षकाच्या उपस्थितीत प्रत्यक्ष शिकवून दाखवावे लागे. ह्या परीक्षेला पदवीधर, बिन पदवीधर व शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांना बसता येईल. परंतु 1966 साली S. T. C. परीक्षा बंद झाली.

**1904 चा शासन निर्णय :-**

1904 च्या शासकीय ठरावाने असे जाहीर केले की, 'जर माध्यमिक शाळेतील शिक्षणाचा दर्जा वाढवावयाचा असेल व जर टिपणे, पाठ्यपुस्तके यांची विद्यार्थ्यांची घोकंपट्टी टाळावयाची असेल आणि युरोपीयन ज्ञानाचा योग्य रीतीने प्रसार करावयाचा असेल तर शिक्षकांना अध्यापन कलेचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.'

1) शाळांत प्रशिक्षित शिक्षकच नेमावेत.

2) प्रशिक्षण विद्यालयात अधिक लायक स्टाफ नेमावा.

3) विद्यालयातील ग्रंथालये व पदार्थ ग्रंथालये सुसज्ज करावीत.

4) प्रशिक्षण विद्यालयांना अध्यापन सराव शाळा जोडण्यात याव्यात.

5) पदवीधर शिक्षकांसाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम एक वर्षाचा असावा.

अभ्यासक्रमाने प्रामुख्याने अध्यापन शास्त्राचे तात्विक व प्रात्यक्षिक स्वरूप शिक्षकांच्या मनावर बिंबण्यावर भर द्यावयास पाहिजे.

1906 मध्ये सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज शासनाने सुरू केले. ह्या विद्यालयाने आपली स्वत:ची पदविका S. T. C.D. (Secondary Training College Diploma) सुरु केली. 1923 मध्ये मुंबई विद्यापीठाला संलग्न झाल्यावर B. T. (Bachelor of Teaching) ही पदवी सुरू केली. पुढे 1956 मध्ये ही पदवी B.Ed. (Bachelor of Education) झाली.

1908 मध्ये कलकत्यात डेव्हिड हेअर ट्रेनिंग कॉलेज उघडण्यात आले. ह्या प्रशिक्षण विद्यालयासाठी पदवीधरांसाठी बी. टी. व बिन पदवीधारकांसाठी (Intermediate Passed Teacher) पदव्या स्थापल्या. 1910 मध्ये ढाका ट्रेनिंग कॉलेज स्थापण्यात आले.

भारत शासनाचे 1904 ते 1913 चे शैक्षणिक ठराव व कलकत्ता विद्यापीठ आयोग यांच्या शिफारशीमुळे शिक्षक प्रशिक्षणास गती मिळाली. 1927 मध्ये देशात 21 प्रशिक्षण विद्यालये आणि 1250 प्रशिक्षणार्थी आणि प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी 695 नॉर्मल व इतर प्रशिक्षण शाळा होत्या आणि त्यात 26274 प्रशिक्षणार्थी होते. 1929 च्या हरटॉग समितीने प्राथमिक शिक्षकांचा सर्वसामान्य शैक्षणिक दर्जा वाढला जावा असे सुचविले आणि प्रशिक्षणाचा काळ वाढवावा आणि प्रशिक्षण संस्थेत पुरेसा शिक्षक वर्ग असावा ही शिफारस केली.

1937 नंतर मूलोद्योगी शिक्षण पद्धतीने शाळेच्या अभ्यासक्रमात मोठा बदल घडवून आणला. मूलोद्योगी क्रियात्मक शिक्षणामुळे शिक्षकांच्या प्रशिक्षणात बराच बदल केला गेला. हेतू असा की मूलोद्योगी शाळात त्यांना आपली भूमिका नीट बजावता यावी.

**विद्यापीठ शिक्षण आयोग (1948-49) :-**

डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ आयोगाने विशेषत: माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे परीक्षण केले आहे. त्या संदर्भात आयोगाने नमूद केले आहे की, अभ्यासक्रमातील तात्विक भाग हा साचेबंद असून प्रत्यक्ष परिस्थितीशी त्याचा संबंध नव्हता. आयोगाच्या मते तात्विक अभ्यासक्रमातील घटक लवचिक ठेवून त्यांचा स्थानिक परिस्थितीशी निगडीत संबंध असावा. म्हणजे विद्यार्थ्यांना तो अभ्यास खराखुरा वाटेल. तसे वर्गातील शिकविणे परिणामकारक करण्यासाठी व वर्ग शिस्त सांभाळण्यासाठी अध्यापनाचा सराव बारा आठवड्यापेक्षा कमी नसावा. अध्यापन सरावासाठी

प्रशिक्षणार्थी ज्या सहकारी शाळेत सराव करीत असतील, त्या शाळेतील सर्व कार्यक्रमात त्या शाळेचे कनिष्ठ दर्जाचे शिक्षक म्हणून त्यांनी काम करावे. ह्या आयोगाची आणखी एक महत्वाची सूचना म्हणजे प्रशिक्षण विद्यालयातील काही निश्चित प्रमाणात (50%) प्राध्यापकांना व व्याख्यात्यांना माध्यमिक शाळेत शिकविण्याचा अनुभव पाहिजे. मग त्यांना शाळेतील दैनंदिन प्रश्नांची समज येईल.

**माध्यमिक शिक्षण आयोग :-**

ह्या आयोगाने माध्यमिक शाळातील अभ्यासक्रम बहुउद्देशीय असावा अशी शिफारश केली. साहजिकच विविधांगी शाळांसाठी शिक्षक तयार करण्यासाठी आवश्यकता भासली. अशा विद्यालयांना योग्य दर्जा देण्यासाठी ही विद्यालये विद्यापीठांशी संलग्न करावीत आणि विद्यापीठीय प्रशिक्षण पदवी द्यावी.

**भारतीय शिक्षण आयोग :-**

शिक्षणातील तात्विक व प्रात्यक्षिक (Therotical & Practical). भागातील मोठी दरी (Wide gap). दूर करण्यासाठी छात्र-सेवा-काळात योजना करावयास पाहिजे.

शाळेत जर प्रत्यक्ष अनुभवाकडे अधिक लक्ष दिले तर शिक्षण प्रक्रिया अधिक परिणामकारक करता येईल. छात्र-सेवा-काळात सराव अध्यापन असणारच, पण त्याच्या जोडीला शाळेच्या अंतर्बाह्य वातावरणातील विविध प्रत्यक्ष अनुभव असतील. त्यासाठी प्रसिध्द, सुप्रतिष्ठित काम करता आले पाहिजे.

शिक्षण महाविद्यालयात प्राध्यापक व शिक्षकांनी छात्र शिक्षकांना माननीय वागणूक देवून त्यांचा छात्र-सेवा-काल अनुभव समृद्ध केला पाहिजे.

छात्र-सेवा-कालाबाबत कोठारी शिक्षण आयोगाचे मत (1964-66), ''सर्वंकष उमेदवारीच्या कार्यक्रमामुळे विद्यार्थी शिक्षकांना शाळेच्या सर्व कामकाजाचे निरीक्षण करण्याची संधी मिळू शकेल आणि वर्गात व वर्गाबाहेर होणाऱ्या महत्वाच्या व्यावसायिक उपक्रमात त्यांना सहभागी होता येईल. प्रशिक्षण संस्था व सहकारी शाळा यांच्यात सुव्यवस्थित सहकार्य असेल तरच सर्वंकष उमेदवारीचा कार्यक्रम शक्य व सफल होऊ शकेल.''

## 1.2 विषय प्रवेश :-

स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षणाचे स्वरूप पाहिले तर मर्यादित होते. कारण शिक्षण घेणारे विद्यार्थीही मर्यादित होते. त्याचबरोबर ज्या बाबींचे ज्ञान पुरवावयाच्या त्या बाबीही कमी होत्या. त्यामुळे शिकवावयाची आवड व विषयाचे ज्ञान असेल तर यशस्वी शिक्षक होता येत असे. परंतु पुढील कालखंडामध्ये शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची गरज भासू लागली. शिक्षणाचा दर्जा सुधारावयाचा असेल तर शिक्षकांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे असे कोठारी आयोगाने सांगितले. त्याबरोबर प्रशिक्षण कालावधीमध्ये शालेय अनुभव कार्यक्रम असावा, असे सांगितले.

शालेय अनुभव कार्यक्रम हे प्रात्यक्षिक साधारणपणे सर्व विद्यापीठामध्ये 1990-92 पासून सुरू केले. सदरचे प्रात्यक्षिक हे विद्यार्थी शिक्षकांना प्रत्यक्ष शाळेतील कामकाज कसे चालते याचा अनुभव मिळावा हा प्रमुख उद्देश असतो. बऱ्याच वेळी प्राध्यापक म्हणून काम करत असताना बी.एड्. अभ्यासक्रमात सूक्ष्म अध्यापनापासून ते वार्षिक पाठापर्यंतची विविध प्रात्यक्षिके विद्यार्थी शिक्षकांकडून करून घेतली जातात. पैकी शालेय अनुभव कार्यक्रम हे प्रात्यक्षिक जादा दिवस चालणारे असून विद्यार्थी शिक्षक ही पूर्णवेळ शाळेत असतो. त्यापूर्वी त्याला सूक्ष्म अध्यापन, सेतूपाठ, सरास पाठ इ. प्रात्यक्षिकांची शिकवण टप्याटप्याने दिली जाते. एका घटकावर लक्ष केंद्रित करून त्याला अभ्यास दिला जातो आणि नंतर या सर्वाचा एकत्रित परिणाम पाहण्यासाठी शालेय अनुभव कार्यक्रम उपयोगी पडतो. याचाच अर्थ असा की यापूर्वी मिळालेले ज्ञान हे प्रत्यक्ष सलगपणे शाळेत कसे वापरतो याचे निरीक्षण केले जाते. शिवाय असे काही अनुभव असतात की त्याला शाळेशिवाय विद्यार्थी शिक्षकाला देता येत नाहीत. म्हणजेच एक विद्यार्थी शिक्षक म्हणून त्याच्या अंगी कोणती पात्रता आली हे आपणाला या कार्यक्रमामध्ये दिसून येते. सदरची समस्या संशोधन म्हणून याच कल्पनेतून सुचली. कारण विद्यार्थी शिक्षक त्या ठिकाणी कशाप्रकारे वैविध्यपूर्ण कामे करतो व त्यामध्ये कोणते बदल दिसून येतात याचा अभ्यास करण्यासाठी सदरचे संशोधन पुढे आले.

## विभाग दोन

### 1.3 शालेय अनुभव कार्यक्रम :-

1) बी. एड. प्रशिक्षणात अध्यापन तयारीसाठी अनेक उपक्रम राबविले जातात कारण तयार होणारा शिक्षक हा परिपूर्ण व सर्वगुणसंपन्न असावयास पाहिजे. त्यामुळे प्रशिक्षण कालावधीमध्ये विविध उपक्रम राबवून संबंधित विद्यार्थी-शिक्षकांला अनुभवसंपन्न कसे करता येईल यासाठी प्रयत्न केले जातात.

त्यामध्ये सुरूवातीला
1) सूक्ष्म अध्यापन
2) सेतू पाठ
3) सराव पाठ
4) अध्यापनाची प्रतिमाने
5) आशययुक्त अध्यापन पध्दतीची कार्यशाळा
6) शालेय अनुभव कार्यक्रम / छात्र सेवा काल.

या बरोबरच
1) व्यक्तिमत्व विकास शिबीर
2) भाषण-संभाषण कौशल्य शिबीर
3) सह शालेय उपक्रम
4) समाज सेवा
5) आरोग्य शिक्षण
6) क्रीडा शिक्षण

इ. अनेक उपक्रम राबविले जातात. त्यापैकी शालेय अनुभव कार्यक्रम हा प्रात्यक्षिक कार्यातील महत्वाचा भाग आहे. तो कार्यक्रम म्हणजे प्रत्यक्ष विद्यार्थी शिक्षकाला शाळेचे कार्य कसे चालते या विषयी त्याला अनुभव दिला जातो. एक सहाय्यक शिक्षक म्हणूनच विद्यार्थी त्या ठिकाणी काम करीत असतो.

## 2) शालेय अनुभव कार्यक्रम / छात्र सेवा काल :-

कोठारी आयोगाने सुचविल्याप्रमाणे शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षकांना योग्य प्रशिक्षणाची गरज आहे. तरच भावी काळात शिक्षणाने आवश्यक ते बदल घडून येतील. शिक्षकाला नुसते पुस्तकी ज्ञान असून चालणार नाही. तर त्याला प्रात्यक्षिकाचेही ज्ञान देणे महत्वाचे ठरेल. प्रशिक्षण महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असताना त्याला छात्र सेवा कालाची योजना व्हावयास पाहिजे आणि त्या ठराविक काळामध्ये प्रशिक्षणार्थीला अध्यापनाबरोबरच माध्यमिक शाळेमध्ये अध्यापनाबरोबर आणखी जे उपक्रम राबविले जातात त्याची ओळख झाली पाहिजे. सर्व प्रकारचे अनुभव त्यांना देणे आवश्यक आहे. जेणेकरुन शिक्षक म्हणून त्याला शिक्षकांच्या सर्व अंगांची ओळख झाली पाहिजे.

कारण शिक्षणाच्या सर्व साच्यांमधील अभ्यासक्रमामध्ये उदा. डॉक्टर, वकील, इंजिनिअर या अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांना प्रात्यक्षिक म्हणून काही कालावधी त्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला जातो. कारण पुस्तकी ज्ञान आणि प्रात्यक्षिक यामध्ये फारच तफावत आढळते. म्हणून पदवी घेतल्यानंतर प्रत्यक्ष काम करताना कोणत्या अडचणी येतात हे प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रशिक्षणार्थीला ते अनुभव देणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमामुळे प्रशिक्षणार्थीमध्ये अपेक्षित बदल म्हणजे या शालेय अनुभव कार्यक्रमामुळे प्रशिक्षणार्थीस अध्यापनाबरोबरच शाळेमध्ये चालणाऱ्या सहशालेय उपक्रमाची व शालेय व्यवस्थापन, शिक्षक - विद्यार्थी संबंध, शाळेत येणाऱ्या अडचणी यांची माहिती प्रशिक्षणार्थीला होईल व त्यामध्ये कोणत्या सुधारणा कराव्यात जेणे करून परिपूर्ण शिक्षक तयार होईल हा महत्वाचा फायदा होणार आहे.

### शालेय अनुभव कार्यक्रम व्याख्या :-

1. ''विद्यार्थ्यांना शिक्षण विषयक सैध्दांतिक भागाचा पडताळा पाहण्याच्या दृष्टीने व दोन ते तीन आठवडे कालावधीचा सरावपाठा खेरीज अन्य शाळामधून शालेय कामकाजाचे निरीक्षण, अध्यापन आणि प्रत्यक्ष अनुभूती मिळण्याच्या दृष्टीने आयोजित केलेला उपक्रम म्हणजे शालेय अनुभव कार्यक्रम होय.''

2. ''एका ठराविक, मर्यादित सलग अशा कालखंडासाठी शिक्षणशास्त्राच्या प्रशिक्षणार्थी उमेदवाराला, शालेय कार्याचा / कार्यक्रमाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी एखाद्या माध्यमिक शाळेत नियुक्त करणे म्हणजेच शालेय अनुभव कार्यक्रम (उमेदवारी योजना) होय.''

3. ''एका शिक्षक प्रशिक्षणार्थीने एका वर्गावर, एक वा दोन घटकांचे, त्याला दिलेल्या तासिकांना सलगपणे अध्यापन करून, त्यांची घटक चाचणी घेवून आपल्या अध्यापनाची परिणामकारकता तपासणे आणि त्याचवेळी संपूर्ण शालेय जीवनाचा व तेथील कार्यपध्दतीचा परिचय करून घेणे म्हणजेच शालेय अनुभव कार्यक्रम असे म्हणता येईल.''

4. ''तीन ते सहा महिन्यांच्या कालखंडामध्ये शिक्षकाची पूर्ण जबाबदारी स्वीकारण्याचा अर्धवेळ अनुभव म्हणजे उमेदवारी होय.''

## 1.4 विविध विद्यापीठांतर्गत सद्याची कार्यवाही पद्धती :-

प्रत्यक्ष संशोधन हे शालेय अनुभव कार्यक्रम व प्रशिक्षणार्थीच्या क्षमता यांच्या संबंधित असल्यामुळे हा कार्यक्रम सर्व विद्यापीठात कमी जास्त कालावधीमध्ये राबविला जातो. त्यापैकी काही विद्यापीठामध्ये राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमाविषयी माहिती खाली दिली आहे.

### 1) पुणे विद्यापीठ :-

पुणे विद्यापीठाने 2002-03 या शैक्षणिक वर्षापासून अभ्यासक्रमात छात्रसेवाकालाचा अंतर्भाव केल्याने त्यासंबंधित माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

### अ) बी. एड. अभ्यासक्रमाच्या सर्वसामान्य उद्दिष्टांशी छात्र सेवा कालाचा संबंध :-

पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रम पुस्तिकेत नमूद केलेल्या सर्वसामान्य उद्दिष्टांपैकी पुढील उद्दिष्टांचा शालेय अनुभवाचा निकटचा संबंध आहे.

1. शिक्षकाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी विद्यार्थी शिक्षकास सक्षम व सेवातत्पर व्यावसायिक बनविणे.
2. प्रभावी शिक्षक होण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमता व कौशल्ये प्रत्यक्षात वापरणे.

3. पर्यावरण, लोकसंख्या, स्त्री-पुरूष समानता, साक्षरता इ. भारताच्या ज्वलंत प्रश्नांची जाणीव छात्र शिक्षकांत निर्माण करणे.
4. शालेय विद्यार्थ्यांच्या सामाजिक समस्यांची सखोल जाणीव विद्यार्थी शिक्षकांत निर्माण करणे.
5. प्रशासकीय व व्यवस्थापकीय कौशल्ये वापरण्याची संधी मिळणे

**ब) कालावधी :-**

अभ्यासक्रम पुस्तिकेत शालेय अनुभव कार्यक्रमाचा कालावधी 2 आठवड्यांचा असावा असे म्हटले आहे.. त्यामध्ये ब्लॉक टिचिंगसाठी 80 घड्याळी तास व इतर उपक्रमांसाठी 60 घड्याळी तास, असा 140 तासांचा कालावधी दिलेला आहे. दोन आठवड्यामध्ये 12 दिवस मिळतात.

**क) शालेय अनुभव कार्यक्रमाची / छात्र सेवा कालाची उद्दिष्ट्ये :-**

1. शाळेतील अनुभवी शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण करण्याची संधी विद्यार्थी शिक्षकांस देणे.
2. शाळेतील अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ छात्र शिक्षकास मिळवून देणे.
3. शालेय दप्तरासंबंधी सर्व माहिती छात्रशिक्षकास उपलब्ध करुन देणे.
4. शाळेत होणाऱ्या अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमास सहभागी होण्याची संधी छात्र शिक्षकास उपलब्ध करुन देणे.
5. शाळेतील शिक्षकाच्या कामाचा संपूर्ण अनुभव घेणे.

**ड) शालेय अनुभव कार्यक्रमासाठी द्यावयाचे गुण :-**

शालेय अनुभव कार्यक्रमासाठी एकूण 80 + 60 = 140 गुण आहेत. 80 गुण ब्लॉक टीचींगला तर 60 गुण इतर उपक्रमांना अशी विभागणी केली आहे. या गुणाचे नंतर ग्रेडमध्ये रूपांतर केले जाते.

**इ) शालेय अनुभव कार्यक्रमातील प्रत्यक्ष काम :-**

1. ब्लॉक टीचींग :- प्रत्येक अध्यापन पध्दतीचे प्रत्येक चार सलग पाठ घ्यावयाचे आहेत. पाठ टाचण तयार करणे, शैक्षणिक साहित्य तयार करणे, चाचणी तयार करणे, निकालाची मांडणी करणे व संख्याशास्त्रीय विश्लेषण करणे इ. कामे करावी लागतात.

2. आपल्या अध्यापन पध्दतीच्या दुसऱ्या विद्यार्थी शिक्षकाच्या पाठाचे निरीक्षण करणे.

3. शाळेतील रिकामे तास घेणे. (बुलेटीन तास)

4. अनुभवी शिक्षकांच्या तासांचे निरीक्षण करणे.

5. कॅटलॉग भरणे इ. सारखी प्रशासकीय व व्यवस्थापकीय कामे करणे.

6. अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर सहशालेय उपक्रमात सहभागी होणे. उदा. पाठांतर स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, क्रीडा, निबंध, वक्तृत्व, विविध स्पर्धा, इ. तसेच पालकांशी संपर्क करणे.

7. मूल्य शिक्षणाच्या तासिकामधून भाग घटक व मूल्यांचा परिचय शालेय विद्यार्थ्यांस करुन देणे.

8. दैनंदिन अहवाल लिहिणे तसेच प्रत्येक उपक्रमाची नोंद ठेवून अहवाल तयार करणे.

**2) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर :- शालेय अनुभव कार्यक्रम**

**अ) शालेय अनुभव कार्यक्रमाची उद्दिष्टे :-**

1. माध्यमिक शाळेतील दैनंदिन कामकाजात प्रत्यक्ष भाग घेण्याची,बुलेटिन तास घेणे, तज्ञ शिक्षकांचे पाठ निरीक्षण व अभ्यासानुवर्ती कार्यक्रमाचे आयोजन इ. ची संधी प्राप्त करून घेण्यास मदत करणे.

2. शिक्षण प्रशिक्षण प्रक्रियेत अभ्यासलेले सिध्दांत व माध्यमिक शाळांतील प्रत्यक्ष कामकाज यामध्ये समन्वयाची प्रक्रिया करण्यास मदत करणे.

3. माध्यमिक शाळेच्या कामकाजामध्ये आलेल्या नवोपक्रमांचा परिचय करून घेण्यास मदत करणे.

4. माध्यमिक शाळेचे प्रशासन, दप्तर, कार्यपध्दती यांचा परिचय करुन घेण्यास मदत करणे.

5. दोन अध्यापन पद्धतीचे 4 + 4 असे आठ सलग सराव पाठ महाविद्यालयाच्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शन व निरीक्षणाखाली पूर्ण करण्यास मदत करणे.

6. शाळेतील विविध घटक व त्यांच्यावरील जबाबदाऱ्या यांची ओळख करून देणे.

**ब) कालावधी - दोन आठवडे**

योग्य कालखंड - जानेवारीमधील शेवटचा आठवडा आणि फेब्रुवारीमधील पहिला आठवडा असे एकूण दोन आठवडे (72 तास) काम करावे.

**क) आयोजन पद्धती :-**

तीन पायऱ्यानुसार या कार्यक्रमाचे आयोजन करावे. महाविद्यालयाच्या वेगवेगळ्या सराव पाठ शाळांच्या संख्येनुसार विद्यार्थ्यांचे गट करावे. हा गट व 10.1 याप्रमाणे प्राध्यापक यांची यादी व कालावधी संबंधीच्या शाळेच्या मुख्याध्यापकास लेखी कळवून त्यांची पूर्वपरवानगी घ्यावी. सोमवार ते शुक्रवार रोज 5 तास व शनिवार तीन तास असे दोन आठवडे काम करावे.

**ड) पूर्वनियोजन :-**

गटातील विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाची उद्दिष्टे व गुणदान सांगावे. या कार्यक्रमामध्ये छात्राध्यापकांना कोणकोणते अनुभव घ्यावयाचे, कोणती कामे करावयाची, प्रत्येकावर कोणकोणत्या जबाबदाऱ्या आहेत व त्याचे गुणदान कशा प्रकारे होणार आहे याबाबतची सविस्तर माहिती द्यावी.

साधारणतः खालील कामे छात्राध्यापकांनी या कार्यक्रमात करावी अशी अपेक्षा आहे.

1. अध्यापन - सराव पाठ, बुलेटिन पाठ.
2. सहशालेय कार्यक्रम.
3. समाजसेवा.
4. पाठ निरीक्षण.
5. दप्तर पाहणी.
6. ग्रंथालय - प्रयोगशाळा पाहणी.
7. परिपाठ.
8. घटक चाचणी, संख्याशास्त्रीय प्रात्यक्षिक.
9. वेळापत्रक, उपस्थिती पत्रक, टाचण वही निर्मिती.
10. छोट्या विद्यार्थी गटास मार्गदर्शन करणे.

11. गृहपाठ वह्या तपासणे.

प्रशिक्षणार्थींपैकी दोघांना मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक अशी जबाबदारी देवून पूर्ण कार्यक्रमातील कालावधीचे वेळापत्रक तयार करणेस सांगावे. गटांतील इतर छात्राध्यापकांना वर्गशिक्षक, प्रयोग शिक्षक, खेळ शिक्षक, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख, परिपाठ प्रमुख इ. जबाबदारी विभागून घ्यावी जेणे करुन सर्व कामे जबाबदारीने केली जातील.

**इ) कार्यक्रम पश्चात :-**

आपल्या गटातील छात्राध्यापकांची एक मौखिक परीक्षा आयोजित करावी. त्यामध्ये प्रत्येकाने या कार्यक्रमामध्ये केलेले काम समाधानकाररित्या पूर्ण केले आहे का, हे पहावे. त्याचप्रमाणे त्याला आलेले अनुभव, त्याला सुचलेले बदल किंवा सुधारणा विचाराव्यात.

| | गुणदान खालील प्रमाणे करावे. | एकूण गुण 50 |
|---|---|---|
| 1. | परिपाठ व फलक लेखन | 5 |
| 2. | 2 बुलेटिन तासांचे अध्यापन | 5 |
| 3. | सहशालेय कार्यक्रमाचे नियोजन | 5 |
| 4. | खेळाचे / सामन्याचे नियोजन | 5 |
| 5. | दप्तर / ग्रंथालय / वर्गखोल्या इ. ची पाहणी | 5 |
| 6. | वेळापत्रक तयार करणे. | 5 |
| 7. | कार्यानुभव, एन.सी.सी. इ. च्या मध्ये सहभाग | 5 |
| 8. | एकंदरीत कामांची जबाबदारी व अहवाल | 15 |
| | | एकूण 50 |

**अहवाल :-**

12 दिवसांच्या प्रत्यक्ष केलेल्या कामकाजाचा थोडक्यात साधारण 5-6 पानांत अहवाल लिहिणे.

## विभाग तिसरा

### 1.5 प्रशिक्षणाचे स्वरूप :-

**शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयात सेवापूर्व प्रशिक्षणाची उद्दिष्टे व अभ्यासक्रम :-**

शिक्षक-शिक्षणाचे विविध प्रकार पहावयास मिळतात त्यापैकी सेवापूर्व माध्यमिक स्तरासाठी शिक्षक-प्रशिक्षण (बी.एड.) हा एक प्रकार आहे. पदवी परीक्षेच्या गुणांवर व प्रवेश परीक्षेचे गुण लक्षात घेवून एक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जातो.

याखेरीज प्रादेशिक प्रशिक्षण महाविद्यालये व महाराष्ट्रातील काही महाविद्यालयात चार वर्षाचा एकात्मिक अभ्यासक्रम (बी.ए., बी.एड्./ बी.एस्सी. बी.एड.) सुरू आहेत. या अभ्यासक्रमास इ. 12 वी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश परीक्षा देवून प्रवेश घेवू शकतात. या अभ्यासक्रमामध्ये महाविद्यालयीन विषयांचे शिक्षण व व्यावसायिक शिक्षण एकदम घेण्याची सोय आहे.

या अभ्यासक्रमाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत -

1. माध्यमिक शिक्षणाचे स्वरूप, हेतू व तत्वज्ञान आत्मसात करण्यास मदत करणे.
2. आपल्या विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र समजण्यास मदत करणे.
3. समाजीकरणाची प्रक्रिया समजावून घेण्यास मदत करणे.
4. विविध स्तरावरील अभ्यासक्रम विकसनाची, अभ्यासक्रमाचे संक्रमण व मूल्यमापन करण्याची क्षमता विकसित करण्यास मदत करणे.
5. माध्यमिक स्तरावरील विविध इयत्तांना शिकवावयाच्या विषयांतील आशयांचे पृथक्करण करण्यास मदत करणे.
6. मार्गदर्शनाची व समुपदेशनाची कौशल्ये स्वत:मध्ये विकसित करण्यास मदत करणे.
7. आपल्या विद्यार्थ्यांमध्ये बोधात्मक पुनर्रचना करण्यासाठी सर्जनात्मक विचार विकसित करण्यास मदत करणे.
8. शिक्षण प्रणाली व शालेय वर्ग परिस्थिती यावर परिणाम करणाऱ्या घटकाची माहिती करुन घेण्यास मदत करणे.

9. काही विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा ओळखण्यास मदत करणे.

10. शैक्षणिक प्रणालीमध्ये सामाजिक स्त्रोतांचा उपयोग करण्याची क्षमता विकसित करण्यास मदत करणे.

11. संप्रेषण कौशल्ये आणि आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा शालेय प्रणालीमध्ये उपयोग करण्यास मदत करणे.

12. सौंदर्य ग्रहणाबाबतच्या संवेदना विकसित करण्यास मदत करणे.

13. शिक्षणशास्त्रातील कृती संशोधनासहित विविध संशोधनाचा अभ्यास करण्यास मदत करणे.

## 1.6 संशोधनाची गरज व महत्त्व :-

प्रस्तुत विभागामध्ये सदरच्या संशोधनाचे महत्व व गरज यांचा थोडक्यात वृत्तांत दिला आहे.

कोठारी आयोगाने सुचविल्याप्रमाणे शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षकांना योग्य प्रशिक्षणाची गरज आहे. तरच भावी काळात शिक्षणाची गुणवत्ता वाढ होण्यास मदत होईल. शिक्षकांला नुसते पुस्तकी ज्ञान असून चालणार नाही. तर त्याला प्रात्यक्षिकाचेही ज्ञान देणे आवश्यक ठरेल. प्रस्तुत संशोधन हे शिक्षकांच्या अंगी आवश्यक असणाऱ्या क्षमतांवर आधारित आहे. बी. एड. अभ्यासक्रमामध्ये राबविल्या जाणाऱ्या विविध प्रात्यक्षिकांपैकी छात्र सेवा काल हा सलग सराव पाठांचा कार्यक्रम असतो. पूर्ण शाळा विद्यार्थ्यांना चालवावयास दिली जाते. विद्यार्थी शिक्षक एक सहाय्यक शिक्षक म्हणून जी जी कामे करावी लागतात त्या सर्व कामांचा अनुभव त्याला या कालावधीमध्ये दिला जातो आणि या कार्यक्रमांचा त्याच्या शिक्षक म्हणून आवश्यक असणाऱ्या क्षमतांवर काय परिणाम होतो हे अभ्यासले जाणार आहे. म्हणजे क्षमतांमध्ये समृध्दी येते का? या कार्यक्रमाचा नेमका कोणत्या क्षमतांचा जास्त विकास होतो हे पाहिले जाणार आहे. आणि त्या कार्यक्रमामध्ये आणखी कोणते उपक्रम समाविष्ट करावेत म्हणजे क्षमता समृध्दी होईल. हे अभ्यासले जाणार आहे.

आज 21 व्या शतकामध्ये शैक्षणिक विश्वातील प्रत्येक शास्त्र प्रगत बनवली जात आहे. अध्यापनशास्त्र हे सुध्दा प्रगत होत आहे. शिक्षक विद्यार्थी अधिकाधिक प्रगत बनविण्याच्या उद्देशाने शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अनेक प्रक्रियांचा प्रारंभ नव्याने होत आहे. छात्र सेवा काल / शालेय अनुभव कार्यक्रम / उमेदवारी योजना ही सुध्दा त्यातीलच एक प्रक्रिया आहे.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये पदवीधर युवकाला एक परिणामकारक शिक्षक बनवून एखाद्या माध्यमिक शाळेत सेवा करण्यासाठी पाठवावयाचे असते. शाळेत राष्ट्राचे भवितव्य घडविले जात असते. राष्ट्रासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ शाळेतच तयार केले जाते. असे मत कोठारी आयोगाने व त्या नंतरच्या सर्व आयोगांनी मांडले आहे.

थोडक्यात शाळेत निर्मितीचे कार्य चाललेले असते. त्यामुळे शाळेची जागा एक Work-place म्हणून मान्य केली तर त्या ठिकाणी मनुष्यबळाचा विकास करण्यासाठी आवश्यक असणारी विविध प्रकारची कामे सदैव चाललेली असतात. विविध प्रकारची कामे असलेल्या या वास्तवतेचा परिचय विद्यार्थी - शिक्षकाला करून देणे ही शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची प्रमुख जबाबदारी आहे. त्यामुळे या प्रात्यक्षिकाची गरज आहे.

कोठारी आयोगाने सांगितल्याप्रमाणे प्रशिक्षण महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असताना त्याला छात्र सेवा कालाची योजना करावयास पाहिजे आणि त्या ठराविक काळामध्ये प्रशिक्षणार्थीला अध्यापनाबरोबरच माध्यमिक शाळेमध्ये अध्यापनाबरोबर आणखी जे उपक्रम राबविले जातात त्यांची माहिती घेवून त्यांच्यामध्ये विविध क्षमतांचा विकास झाला पाहिजे. सर्व प्रकारचे अनुभव त्याने घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन शिक्षक म्हणून त्याला शिक्षकाच्या सर्व अंगांची ओळख झाली पाहिजे.

कारण शिक्षणाच्या सर्व साच्यामधील अभ्यासक्रमामध्ये उदा. डॉक्टर, वकील, इंजिनिअर या अभ्यासक्रमाचा प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांना प्रात्यक्षिक म्हणून काही कालावधी त्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला जातो. कारण पुस्तकी ज्ञान आणि प्रात्यक्षिक यामध्ये फारच तफावत आढळते. म्हणून पदवी घेतल्यानंतर प्रत्यक्ष काम करताना कोणत्या अडचणी येतात हे प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रशिक्षणार्थीला ते अनुभव देणे गरजेचे आहे.

कारण शिक्षक प्रशिक्षणामध्ये शिक्षक बनण्याच्या प्रक्रियेमध्ये काही टप्पे हे फारच भीतीदायक आणि धक्कादायक असतात. त्याचा परिणाम नवीन दाखल झालेल्या विद्यार्थ्यांवर होत असतो. उदा. सूक्ष्म अध्यापनाचा पहिला तास, पहिल्या सराव पाठांचे पाठ टाचण काढणे, त्यासाठी अध्यापकाचे मार्गदर्शन घेणे, पाठाची तयारी, माध्यमिक शाळेतील पहिला सराव पाठ इ. याची जाणीव ठेवून आज

आपण शिक्षक शिक्षणामध्ये काही नवीन प्रात्यक्षिकांचा समावेश केलेला आहे. परिणामकारक शिक्षक बनण्यासाठी ज्या कौशल्याची गरज आहे अशी सर्व कौशल्ये विविध प्रात्यक्षिकांच्या पूर्ततेतून हळूहळू सरावाने प्रशिक्षणार्थीमध्ये आणली जातात.

सर्व कौशल्ये आत्मसात केल्यानंतर शिक्षक प्रशिक्षणार्थी हा 'शिक्षक' बनला आहे. असे समजून जर त्याला एखाद्या माध्यमिक शाळेत सेवेमध्ये रूजू करून घेतले तर तेथे देखील त्याला सेवा करताना सुरूवातील काही अडचणी येतात. तेव्हा तेथील दैनंदिन कामकाजात त्यास कोणतीही अडचण येऊ नये यासाठीच 'उमेदवारी योजना' या प्रात्यक्षिकाची गरज आहे.

सराव पाठ प्रशिक्षणामध्ये त्या प्रात्यक्षिकामध्ये 35 मिनिटे तासिकेसाठीच एखादा छोटासा उपघटक घेवून प्रशिक्षणार्थी हा माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसमोर सराव पाठ घेण्यासाठी जात असतो. यावेळी एखाद्या पूर्ण घटकामधील एखादा छोटासा भाग शिकविण्याचे त्याला प्रशिक्षण दिले जात असते. संपूर्ण घटक शिकविण्याचे प्रात्यक्षिक त्याला दिले जात नाही. एखादा घटक पूर्णपणे एखाद्या वर्गावर शिकविण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण त्याला देणे आवश्यक आहे. यासाठी विद्यार्थी शिक्षकाला एखाद्या माध्यमिक शाळेत ठराविक दिवस अध्यापनाचे कार्य करण्यासाठी नियुक्त करावे लागेल. या प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून अशी नियुक्ती केल्यास एखाद्या वर्गावर एखाद्या विषयातील पूर्ण घटक शिकविताना येणाऱ्या सर्व अडचणी प्रशिक्षणार्थींना ज्ञात होतात. त्याचबरोबर त्या घटकासंदर्भात कोणते प्रश्न करावयाचे, कोणती शैक्षणिक साधने वापरावयाची, अध्यापन करताना कोणत्या बाबी ध्यानात घ्यावयाच्या आणि त्या घटकावर शेवटी चाचणी कशी तयार करावयाची व त्याचे गुणपत्रक कसे तयार करावयाचे इ. बाबतची परिपूर्ण अशी माहिती मिळण्यास मदत होते.

शालेय अनुभव कार्यक्रमाच्या (प्रात्यक्षिकाच्या) पूर्ततेनंतर शिक्षक प्रशिक्षणार्थींना काही प्रमुख बाबींची पूर्तता करून त्या स्पष्ट करता आल्या पाहिजेत.

1. माध्यमिक शाळेतील दैनंदिन कामकाजाची माहिती त्यास सांगता आली पाहिजे.
2. शिक्षणशास्त्रातील सिध्दांत आणि माध्यमिक शाळेतील प्रत्यक्ष कामकाज यामध्ये समन्वयाची प्रक्रिया कशी करता येईल याबाबतची माहिती त्याला देता आली पाहिजे.

3. सलग अध्यापनाची संकल्पना त्या स्पष्ट करता आली पाहिजे. इ. 5 ते 10 वी मधील कोणत्याही इयत्तेवर त्यांचे स्वत:चे विषयातील घटकांचे त्यास सलग अध्यापन करता आले पाहिजे.
4. दैनंदिन पाठ टाचण त्यास काढता आले पाहिजे.
5. माध्यमिक शाळेतील विषय तज्ञ अध्यापकाचे ठिकाणी असणारी प्रमुख अध्यापन कौशल्ये त्यास स्पष्ट करता आली पाहिजेत.
6. माध्यमिक शाळेतील रिक्त तासिकांना त्यास सर्व तयारी न करता देखील अध्यापन करता आले पाहिजे.
7. अभ्यासपूरक कार्यक्रमाचे नियोजन आणि त्याची कार्यवाही करता आली पाहिजे.
8. शालेय जीवनातील महत्वाच्या पैलूंची माहिती त्यास सांगता आली पाहिजे.
9. माध्यमिक शाळेतील कार्यालयीन दप्तराबद्दल त्याला सविस्तर माहिती सांगता आली पाहिजे.
10. सेवेत दाखल झालेल्या शाळेत नाविन्यपूर्ण असे विविध नवोपक्रम त्याला राबविला आहे पाहिजेत.
11. 'वर्ग शिक्षक' म्हणून करावी लागणारी सर्व कामे त्याला करता आली पाहिजेत.
12. शाळेस परिपाठांतर्गत येणाऱ्या सर्व बाबींची कार्यवाही त्यास करता आली पाहिजे.
13. शाळेतील सर्व प्रकारची वेळापत्रके त्यास तयार करता आली पाहिजेत.
14. शिक्षक प्रशिक्षणार्थीला स्वत:चे विषयाचे 'नमुना पाठ' घेवून दाखविता आला पाहिजे.

अशा या सर्व गोष्टी प्रशिक्षणार्थीला पूर्ण करता आल्या तर शाळेत अनुभव कार्यक्रम यशस्वी होईल व शिक्षक म्हणून विद्यार्थी शिक्षकांच्या अंगी क्षमता विकसित होतील.

त्याचबरोबर शिक्षक प्रशिक्षकांच्या पूर्वचाचणी व उत्तर चाचणी घेतली जाणार आहे. महाविद्यालयातील मार्गदर्शक प्राध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली करावयाचे काम यामध्ये अध्यापन हे काम महत्वाचे असते.

शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी NCERT आणि NCTE या संस्थांनी या प्रकारच्या संशोधनाला विशेष महत्व दिले आहे. (1978)

या उपक्रमामुळे प्रशिक्षणार्थीमध्ये अपेक्षित बदल म्हणजे या शालेय अनुभव कार्यक्रमामुळे प्रशिक्षणार्थीस अध्यापनाबरोबरच शाळेमध्ये चालणाऱ्या सहशालेय उपक्रमांची व शालेय व्यवस्थापन, शिक्षक-विद्यार्थी संबंध, शाळेत येणाऱ्या अडचणी यांची माहिती प्रशिक्षणार्थीला होईल. त्यामध्ये कोणत्या सुधारणा कराव्यात जेणे करून परिपूर्ण शिक्षक तयार होईल. हा महत्वाचा फायदा प्रशिक्षणार्थींस होणार आहे.

Teacher Education (1978) Curriculum - A Frame Work.

शालेय अनुभव कार्यक्रमामध्ये विद्यार्थी शिक्षकाला सुसंगत व अखंड अध्यापन करण्यास संधी मिळणे, घटकात सलगता असल्याने पाठ परिणामकारक होतात. विद्यार्थ्यांशी चांगले संबंध जोडल्याने त्यांच्याशी उत्तम प्रकारे सुसंवाद साधता येतो. परिणामी वर्ग शिस्त सुलभ होते. या अवधीत शाळेतील शिक्षकांशी सतत संबंध आल्याने सहकार्याची भावना वाढते.

सहशालेय कार्यक्रमाचे नियोजन, संघटन करण्यास मिळाल्याने नेतृत्वाच्या गुणांची वाढ होते. शालेय दप्तराची तोंड ओळख होते. या कालावधीत विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी वर्गाचा एक कनिष्ठ सदस्य समजला गेल्याने तो शाळेच्या दैनंदिन कार्याशी एकरूप होतो.

**1.7 संशोधन समस्येची निश्चिती व शीर्षक :-**

''शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांतर्गत शालेय अनुभव कार्यक्रमांचा प्रशिक्षणार्थींच्या क्षमतांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास''

**1.8 संशोधन समस्येतील तांत्रिक संज्ञांच्या व्याख्या :-**

**1. शिक्षणशास्त्र महाविद्यालय :-**

"It is a college specialising in teacher education."

-Dictionary of Education, R. P. Tanja.

**2. शिक्षक प्रशिक्षण :-**

"Refers to professional education and training of teachers, consisting of course work combined with supervised practice teaching and also in service course." - Dictionary of Education - R. P. Tanja

''व्यक्तीला विशिष्ट व्यावसायिक कौशल्य प्राप्त होण्यासाठी देण्यात येणारे शिक्षण म्हणजे प्रशिक्षण.''

### 3. शालेय अनुभव कार्यक्रम :-

''विद्यार्थ्यांना शिक्षण विषयक सैध्दांतिक भागाचा पडताळा पाहण्याच्या दृष्टीने दोन ते तीन आठवडे कालावधीचा सराव, पाठाखेरीज अन्य शाळामधून शालेय कामकाजांचे निरीक्षण, अध्यापन आणि प्रत्यक्ष अनुभूती मिळण्याच्या दृष्टीने आयोजित केलेला उपक्रम म्हणजे शालेय अनुभव कार्यक्रम होय.''

''एका ठराविक, मर्यादित सलग अशा कालखंडासाठी शिक्षणशास्त्राच्या प्रशिक्षणार्थी उमेदवाराला, शालेय कार्याचा / कार्यक्रमाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी एखाद्या माध्यमिक शाळेत नियुक्त करणे म्हणजेच शालेय अनुभव कार्यक्रम (उमेदवारी योजना) होय.'' - डॉ. आर. डी. बेलेकर.

''एका शिक्षक प्रशिक्षणार्थीने एका वर्गावर, एक वा दोन घटकांचे, त्यास दिलेल्या तासिकांना सलगपणे अध्यापन करून, त्यांची घटक चाचणी घेऊन आपल्या अध्यापनाची परिणामकारकता तपासणे आणि त्याचवेळी संपूर्ण शालेय जीवनाचा व तेथील कार्यपध्दतीचा परिचय करून घेणे म्हणजेच शालेय अनुभव कार्यक्रम असे म्हणता येईल.'' - डॉ. आर. डी. बेलेकर.

''तीन ते सहा महिन्यांच्या कालखंडामध्ये शिक्षकाची पूर्ण जबाबदारी स्वीकारण्याचा अर्धवेळ अनुभव म्हणजे उमेदवारी योजना होय.'' - डॉ. आर. डी. बेलेकर.

### 4) क्षमता :-

''कोणत्याही मूर्त आणि अमूर्त वस्तूंच्या किंवा व्यक्तीच्या अंगी असणारी पात्रता म्हणजे क्षमता होय.''

''प्रत्येक व्यक्तीमधील उपजत गुण व सुप्त शक्तीचे उपयोगितेत होणारे रूपांतर म्हणजे क्षमता.''

"Competency test - Tests designed to assess it a particular skill has been learned." - Dictionary of Education - R . P. Tanja.

5. **प्रशिक्षणार्थी :-**

''पुणे विद्यापीठच्या प्रशिक्षण महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेला पदवीधर व पदव्युत्तर विद्यार्थी-विद्यार्थींनी म्हणजे प्रशिक्षणार्थी.''

''ज्याने मान्यताप्राप्त विद्यापीठांची पदवी संपादन करून शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षण महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला आहे असा विद्यार्थी म्हणजे प्रशिक्षणार्थी.''

## 1.9 संशोधनाची उद्दिष्टे :-

1. शालेय अनुभव कार्यक्रमाची संकल्पना, उद्देश, स्वरूप या उपक्रमांतर्गत घटकांचा शोध घेणे.
2. शालेय अनुभव कार्यक्रमाचे नियोजन व कार्यवाही यांचा अभ्यास करणे.
3. शालेय अनुभव कार्यक्रमाशी संबंधित क्षमतांची निश्चिती करणे.
4. शालेय अनुभव कार्यक्रमाचा प्रशिक्षणार्थीच्या क्षमतांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

## 1.10 संशोधनाची गृहितके :-

1. बी. एड. अभ्यासक्रमामध्ये शालेय अनुभव कार्यक्रम राबविला जातो.
2. शालेय अनुभव कार्यक्रम दोन आठवडे या कालावधीमध्ये राबविला जातो.
3. शालेय अनुभव कार्यक्रम नेहमीच्या सरावपाठ शाळा व्यतिरिक्त अन्य शाळांमध्ये राबविला जातो.
4. व्यावसायिक अभ्यासक्रमात शालेय अनुभव कार्यक्रमाची प्रत्यक्ष अनुभूतीसाठी आवश्यकता असते.

## 1.11 संशोधनाची परिकल्पना :-

1. शालेय अनुभव कार्यक्रमाचा प्रशिक्षणार्थींच्या अध्यापन क्षमतेत लक्षणीय फरक पडत नाही.
2. शालेय अनुभव कार्यक्रमाचा प्रशिक्षणार्थींच्या अभ्यासेत्तर कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या क्षमतांमध्ये जाणवणारा फरक आढळत नाही.
3. शालेय अनुभव कार्यक्रमाचा प्रशिक्षणार्थींच्या नियोजन आणि व्यवस्थापन क्षमतेत लक्षणीय फरक पडत नाही.
4. शालेय अनुभव कार्यक्रमाचा प्रशिक्षणार्थींच्या मूल्यमापन क्षमतेत लक्षणीय फरक आढळत नाही.
5. शालेय अनुभव कार्यक्रमामुळे प्रशिक्षणार्थींची शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर क्षमतेत फरक पडत नाही.

6. शालेय अनुभव कार्यक्रमामुळे सैध्दांतिक व प्रात्यक्षिक भागात समन्वय साधला जातो.

**1.12 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

**व्याप्ती :-** पुणे विद्यापीठांतर्गत असलेल्या शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयांपैकी अहमदनगर जिल्ह्यातील असलेल्या प्रशिक्षण महाविद्यालयांपैकी फक्त एका महाविद्यालयाची निवड केली आहे. ते म्हणजे -
1) स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर.

या महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींचा अभ्यास प्रस्तुत संशोधनामध्ये केला आहे.

**मर्यादा :-** सदरच्या संशोधनाच्या मर्यादा खालीलप्रमाणे -

1. संबंधित संशोधन शिक्षणशास्त्र महाविद्यालयापुरते मर्यादित आहे.
2. सदरचे संशोधन मराठी माध्यमतापुरते प्रशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.
3. या संशोधनात मुले व मुली या दोन्ही प्रशिक्षणार्थींना समाविष्ठ केले आहे.
4. सदर संशोधन अनुदानित प्रशिक्षण महाविद्यालयाशी निगडीत आहे.
5. सदरचे संशोधन एका शिक्षणशास्त्र महाविद्यालयापुरते मर्यादित आहे.
6. शालेय अनुभव कार्यक्रम ग्रामीण विभागातील शाळांशी संबंधित आहे.

**1.13 प्रकरण योजना :-**

**प्रकरण 1 - प्रस्तावना**

या प्रकरणात संशोधन समस्येच्या संदर्भातील शालेय अनुभव कार्यक्रमाची संकल्पना, स्वरूप, कार्यवाही या विषयी माहिती दिली आहे. काही संकल्पनांची ओळख, संशोधनाची पार्श्वभूमी, संशोधनाची गरज व महत्व, समस्या विधान, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनातील गृहितके, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधन परिकल्पना व शेवटी संशोधन प्रबंधाची रूपरेषा दिली आहे.

**प्रकरण 2 - संबंधित साहित्याचा आढावा.**

या प्रकरणात या विषयाशी संबंधित पूर्वी झालेल्या संशोधन अभ्यासाचा आढावा घेतला आहे. यामध्ये शिक्षकांच्या क्षमतांच्या संदर्भात झालेल्या संशोधनाचा आढावा घेतला आहे.

**प्रकरण 3 - संशोधन कार्यपध्दती.**

या प्रकरणात संशोधन कार्यपध्दतीचे विवेचन केले आहे. यामध्ये संशोधन पध्दतीची निवड, प्रायोगिक पध्दती, प्रायोजिक अभिकल्प निवड, सप्रमाणतेसाठी नियंत्रण, चलघटक न्यादर्श व न्यादर्शन तसेच उपयोगात आणलेली सांख्यिकी तंत्रे याविषयीचे विवेचन केले आहे.

**प्रकरण 4 - माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन.**

या प्रकरणात संकलित माहितीचे सांख्यिकी तंत्राच्या सहाय्याने विश्लेषण केले आहे.

**प्रकरण 5 - सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी.**

या प्रकरणात प्रथम संशोधनाचा सारांश दिला असुन नंतर निष्कर्ष मांडले आहेत. प्रकरणाच्या शेवटी शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय सुचविले आहेत.

प्रकरण पाचनंतर संदर्भ ग्रंथ सूची व परिशिष्ट्ये दिलेली आहेत.

अशा प्रकारे प्रस्तुत संशोधन अहवालाचे प्रमुख तीन भाग केलेले असून प्राथमिक विभागात मुखपृष्ठ, प्रतिज्ञापत्र, प्रमाणपत्र, ऋणनिर्देश, अनुक्रमणिका व कोष्टक - आलेख, सूची यांचा समावेश असून अहवालाच्या मुख्य भागात पाच प्रकरणे व अंतिम भागात संदर्भ ग्रंथसूची व परिशिष्ट्ये यांचा समावेश आहे.